| | | |
|---|---|---|
| | पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर पिन–४४४६०१<br>गुन्हेशाखा, युनिट क्र. २ अमरावती शहर क्र. 0721–2671000<br>E mail id :- acpcrime.cpamt@nic.in | |

प्रेस नोट

दि. ०३/०१/२०२५

# अमरावती शहर गुन्हेशाखा युनिट २ कडुन अवैध्य शस्त्र बाळगणारा आरोपीस जेरबंद

मा. पोलीस आयुक्त साहेब यांचे निर्देशान्वये आयुक्तालय हद्दीतील अवैध्य शस्त्र बाळगणा-या ईसमांवर कार्यवाही करावी अशा निर्देशान्वये गुन्हेशाखा अमरावती शहर येथील पोलीस निरीक्षक श्री. बाबाराव अवचार यांचे आदेशाने युनिट क. २ येथील पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार नेमुन खालील प्रमाणे अवैध्य शस्त्र बाळगणारे इसमावर कार्यवाही करण्यात आली आहे.

दि. ०३/०१/२०२५ रोजी गुन्हेशाखा युनिट कमांक २ चे पथक हे आयुक्तालय हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना पेट्रोलींग दरम्यान गुप्त बातमीदाराकडुन खात्री लायक माहीती मिळाली की आदित्य वाईन शॉप दस्तुर नगर येथे एक इसम हा हातात शस्त्र घेवुन दहशत घालत आहे. अशा माहीत वरून आदित्य वाईन शॉप दस्तुर नगर येथे गेले असता. आरोपी कुणाल विनोद विघ्ने वय २५ वर्ष रा. दि ग्रेटर कैलास नगर अमरावती यास अतिशय शिताफिनी ताब्यात घेवुन त्याचे हातातील १) एक लोखंडी चाकु दोन्ही बाजुला धारदार शस्त्र असलेले कि.अं. ५००/- रू २) एक रामपुरी चाकु एका बाजुन धारदार शस्त्र असलेले कि.अं. १०००/- रूपये असा एकुण १५००/- रू चा माल मिळुन आल्याने सदर आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा येथे कलम ४/२५ आर्म ॲक्ट सहकलम १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर ची कारवाई मा. पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी साहेब अमरावती शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त श्री गणेश शिंदे साहेब, पोलीस उपायुक्त श्रीमती कल्पना बारावकर मॅडम पोलीस उपायुक्त श्री. सागर पाटील साहेब, सहायक पोलीस आयुक्त गुन्हेशाखा श्री. शिवाजी बचाटे साहेब पोनि. श्री. बाबाराव अवचार साहेब गुन्हे शाखा अमरावती शहर यांचे नेतृत्वाखाली पोउपनि संजय वानखडे पोलीस अंमलदार दिपक सुंदरकर गजानन ढेवले आस्तीक देशमुख मंगेश शिंदे संग्राम भोजने चेतन कराडे राजीक रायलीवाले संदीप खंडारे सागर ठाकरे यांनी केली आहे.

जनसंपर्क कार्यालय
पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर.